**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय:- भिवंडी पुर्व मतदार संघातील भि.नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.३ येथील मन्सुराबाद इमाम हुसेन मस्जिद येथे कॉक्रीटकरण रस्ता व गटार तयार करणे.**

विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.३९,९८,४२२ करिता ई-निविदा सुचना क्र.१३५/२०२३-२४, टेंडर नं. ९७८२९८ अन्वये दि.०२/०१/२०२४ ते ०९/०१/२०२४ या कालायधीत बी-१ पध्दतीची फेर ई निविदा मागविण्यात आली आहे. दिनांक १२/०१/२०२४ रोजी टेक्नीकल बिड (लिफाफा-१) उघडली असता या कामी २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तांत्रिक निविदा छाननी अंती निविदासमितीने २ ही निविदाकार यांना पात्र ठरविण्यात आले असुन लिफाफा-२ फायनानशियल बिड दिनांक २५/०१/२०२४ रोजी उघडली असुन त्याचा तौलनिक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर (टक्के) | निविदेतील रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | मे. मानसी कंन्स्ट्रक्शन, | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६ टक्के कमी दराने | ३८,५२,०८०/- |
| २ | मे.पुरवी इंटरप्रायजेस, | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०५ टक्के कमी दराने | ३९,५६,४३९/- |

वरील पैकी मे.मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६ टक्के कमी दराची रक्कम रुपये. ३८,५२,०८०/- (अडतीस लक्ष बावन्न हजार ऐंशी) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**दिनांक :-** 14/02/**२०२४**

**ठराव क्रं.** 346

मे.मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६ टक्के कमी दराची रक्कम रुपये ३८,५२,०८०/- (अडतीस लक्ष बावन्न हजार ऐंशी) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी पुर्व मतदार संघातील भि.नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्रं.१ अंतर्गत वॉर्ड क्रं.३ येथील मन्सुराबाद इमाम हुसेन मस्जिद येथे कॉक्रीटकरण रस्ता व गटार तयार करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,४३,८५,५९९/-) या कामाची बी-१ प्रकारची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १२१/२०२३-२४ (ऑनलाईन टेंडर क्र. ९६८८४०) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. सदर कामासाठी एकुण पात्र ०२ निविदांपैकी **मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१०% दराने कमी असुन त्यानुसार कामाची रक्कम रु. १,४०,६७,६७७/- (**GST** सह) येत आहे.

**मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांची प्राकलन दरापेक्षा २.१०% कमी दराची निविदा रक्कम रु. १,४०,६७,६७७/- (अक्षरी रु. एक कोटी चाळीस लाख सदुसष्ट हजार सहाशे सत्याहत्तर रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक १३/०२/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रं. : ३५७ दिनांक :- १५/ २ /२०२४

**वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे. **हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा २.१०% कमी दराची म्हणजेच रक्कम रु. १,४०,६७,६७७/- (अक्षरी रु. एक कोटी चाळीस लाख सदुसष्ट हजार सहाशे सत्याहत्तर रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, **वॉर्ड क्रं. २१ मधील वऱ्हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासुन ते मनपा शाळा क्रं. ३३ पर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे.** याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग.**

**विषय :- धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणेबाबतच्या ई-निविदेतील कमी दराला प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

व-हाळा जी.एस.आर. पासून ते वाझे मोहल्ला पर्यंतची मुख्य व-हाळा वितरण व्यवस्था ६० वर्षापेक्षा जास्त जुनी असून ती पी.एस.सी. पाईप (सिमेन्ट कॉक्रिट पाईप) ची असल्याने कालबाहय झालेली आहे. व त्यामधून मोठया प्रमाणात पाणी गळती होत असून सदर होणा-या गळतीमुळे शहरामध्ये जलवाहिनीच्या शेवटच्या टोकास कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच सदर ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. कडून सी.सी. रोड प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्या कामाचे कार्यादेश देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून रस्त्याचे काम सूरू होण्यापूर्वी सदर ठिकाणी नवीन जलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे, जेणे करून भविष्यामध्ये रस्ता खोदावा लागणार नाही. सद्यस्थितीत असलेल्या सदर जलवाहिनीद्वारे धामणकरनाका, माधवनगर, सोमानगर, अजंठा कंम्पाऊंड, कणेरी, मोहल्ला, बंदरमोहल्ला, गौरीपाडा, दर्गारोड, इद्दगाहरोड कासारआळी, वाणी आळी, रोशनबाग, भोईवाडा, भुसार मोहल्ला, ब्राम्हणआळी, हफसनआळी इत्यादी जुन्या भिवंडी शहरातील परिसरामध्ये पाणी पुरवठा होतअसून अस्तित्वात असलेली जुनी जलवाहिनी बदलनेचे काम करणे गरजचे आहे. सदर कामाकरीता आवश्यक असणारे ५०० मी.मी. व ४५० मी.मी. व्यासाचे डी.आय. पाईप व-हाळा जी.एस.आर. वितरण व्यवस्था बळकटीकरण करणेकामी २००५ साली खरेदी करण्यात आलेल्या होत्या व आजमितीस सदर पाईप उपलब्ध असून प्रशासनास हे काम करतांना ५०० मी. मी. ४५० मी. मी, ४०० मी.मी. व ३०० मी. मी. व्यासाचे डी.आय. पाईप खरेदी करावे लागणार नाहीत.

व-हाळा तलाव जी. एस. आर. जलकुंभाद्वारे २८ एम.एल.डी. पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्यात येत असून जुन्या जलवाहिनीमुळे होणा-या गळतीमुळे जुन्या भिवंडी शहरामध्ये आजही पाणी टंचाई असून त्या करीता उपरोक्त काम करणे अत्यंत गरजेचे आहे.

धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबत रु. १,२०,५७,९९१/- मात्रची अल्प मुदतीची ई-निविदा सुचना क्र. ४५ दि.०८/०१/२०२४ ते १५/०१/२०२४ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व लोकमत, हमारा महानगर व फ्रि प्रेस या वृत्तपत्रात पसिध्द करण्यांत आली होती. दिनांक २४/०१/२०२४ रोजी ई-निविदा निविदा समिती समोर उघडली असता एकूण २ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबत.** | रु. १,१९,९१,६७२/- |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

**प्रशासकीय ठराव क्र.** ३५८

**दिनांक :-** १५ /02 /**२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणेबाबतच्या कामाचे निविदाकार मे. हिंदुस्तान इंटरप्रायजेस यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५० टक्के कमी दराने म्हणजेच रु. १,१९,११,६७२/- मात्र प्रमाणे असून या दरांना मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.**

o/c

**प्रस्तावना:-**

**विषय:-. भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 01 प्रभाग क्र. 05 मध्ये आदर्श पार्क येथील आर.आर पाटील स्कुल ॲण्ड प्ले ग्राउंड जॉगिंग ट्रॅक करणे.**
**(महानगरपालिका क्षेत्रात"मुलभुत सोयीसुविधांचा विकास"या योजने अंतर्गत )**

**भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 01 प्रभाग क्र. 05 मध्ये आदर्श पार्क येथील आर.आर पाटील स्कुल ॲण्ड प्ले ग्राउंड जॉगिंग ट्रॅक करणे बाबत.** कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,२०,०००/-मात्रच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांची मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा. प्रशासकीय ठराव क्रं.१७२ दिनांक २२/०५/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,२०,०००/- **फेर** ई-निविदा सुचना क्र.१०६/९५९७८०(२०२३-२४) दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०३/११/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची **फेर** ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी निविदाकारांची नावे निविदेतील दर एकुण **एक निविदाकार** खालील प्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **मे. ॲकार्ड असोसिएट्रस** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा –८.१०० टक्के कमी दराने** |

वरील पैकी **मे. ॲकार्ड असोसिएट्रस** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा **–८.१००%** कमी दराने म्हणजेच रक्कम रु. ४५,२१,८४०/-(अक्षरी पंचेचाळीस लाख एकविस हजार आठशे चाळीस मात्र )च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.: - ३५८ दिनांक :- १६/०२/२०२४

**मे. ॲकार्ड असोसिएट्रस** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा**–८.१००%** कमी दराने म्हणजेच रक्कम रु. ४५,२१,८४०/- (अक्षरी पंचेचाळीस लाख एकविस हजार आठशे चाळीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त **भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 01 प्रभाग क्र. 05 मध्ये आदर्श पार्कयेथील आर.आर पाटील स्कुल ॲण्ड प्ले ग्राउंड जॉगिंग ट्रॅक करणे बाबत.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. ॲकार्ड असोसिएट्रस** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च, पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे व बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे कामीच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.प्रशासक तथा आयूक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. सन २०२३ - २०२४ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यांत आली होती. या तरतूदीमधून आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमूद आहे.

(आकडे लाखात)

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ४५ लक्ष |
| १ | जुनी भुयारी गटार जोडणी | २३.७० | २१.८२ | १.८८ | |
| | | | | | ३० लक्ष |
| २ | पाणी पुरवठा स्थापत्य कामे | १००.०० | ९९.४१ | ०.५९ | |
| | | | | | ५ लक्ष |
| ३ | बुस्टर पंपींग मशिनरी खरेदी | २०.०० | १९.९० | ०.१० | |
| | | | | २.५७ | ८० लक्ष |
| | **एकुण** | | | | |

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये **जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च, पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे व बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी** विशेष बाब या सोईच्या दृष्टीने शहरातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा होणेकरीता निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेष: व कलम ४५२ (अ) च्या कलम (१ब) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दि.०२/०६/२०२३ रोजी मान्यता मिळालेली आहे.

शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियक्त करण्यात आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

१) सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाकरीता **जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च** या लेखाशिर्षकात रु.२३.७० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून रु.२१.८२ लक्ष खर्च झाले आहे उर्वरीत रु.१.८८ लक्ष तरतूद शिल्लक असुन मंजुर कामांचे प्रस्ताव एकुण रु.४५.०० लक्ष निधी अभावी प्रलंबित आहेत. त्यामुळे जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च या लेखाशिर्षात **रु.४५.०० लक्ष पुर्नविनियोजन** करणेची आवश्यकता आहे.

२) सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाकरीता **पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे** या लेखाशिर्षकात रु.१००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून रु.९९.४१ लक्ष खर्च झाले आहे. उर्वरीत रु.०.५९ लक्ष तरतूद

शिल्लक असुन मंजुर कामांचे प्रस्ताव एकुण रु.३०.०० लक्ष निधी अभावी प्रलंबित आहेत. त्यामुळे पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे या लेखाशिर्षात **रु.३०.०० लक्ष पुर्नविनियोजन** करणेची आवश्यकता आहे.

३) सन २०२३-२४ या आर्थीक वर्षाकरीता **बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी** या लेखाशिर्षकात रु.२०.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून रु.१९.९० लक्ष खर्च झाले आहे उर्वरीत रु.०.१० लक्ष तरतूद शिल्लक असुन मंजुर कामांचे प्रस्ताव एकुण रु.५.०० लक्ष निधी अभावी प्रलंबित आहेत. त्यामुळे बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी या लेखाशिर्षात **रु.५.०० लक्ष पुर्नविनियोजन** करणेची आवश्यकता आहे.

सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात २५ एम.एल.डी. एकात्मिक पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षात रु.२२४.७२ इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीमधून आतापर्यंत रु.१४२.४५ लक्ष खर्च झालेला आहे. उर्वरीत रु.८२.२७ लक्ष शिल्लक आहे. या तरतूदीमधून १) जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च या लेखाशिर्षात रु.४५.०० लक्ष २) पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे या लेखाशिर्षात रु.३०.०० लक्ष व ३) बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी या लेखाशिर्षात रु.५.०० लक्ष असे एकुण रु.८०.०० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावीत करण्यात येत आहे.

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात २५ एम.एल.डी. एकात्मिक पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकाच्या तरतूदीमधून १) जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च या लेखाशिर्षात रु.४५.०० लक्ष २)पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे या लेखाशिर्षात रु.३०.०० लक्ष व ३) बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी या लेखाशिर्षात रु.५.०० लक्ष असे एकुण रु.८०.०० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ३६० **दिनांक :** १६/०२/**२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात २५ एम.एल.डी. एकात्मिक पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकाच्या तरतूदीमधून १) जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च या लेखाशिर्षात रु.४५.०० लक्ष २) पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे या लेखाशिर्षात रु.३०.०० लक्ष व ३) बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी या लेखाशिर्षात रु.५.०० लक्ष असे एकुण रु.८०.०० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात २५ एम.एल.डी. एकात्मिक पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकाच्या तरतूदीमधून १) जुनी भुयारी गटार जोडणी वरील खर्च या लेखाशिर्षात रु.४५.०० लक्ष २) पाणी पुरवठा विभागाकडील स्थापत्य कामे या लेखाशिर्षात रु.३०.०० लक्ष व ३)बुस्टर पंपींग मशीनरी खरेदी या लेखाशिर्षात रु.५.०० लक्ष असे **एकुण रु.८०.०० लक्ष** पुर्नविनियोजन करणेकरीता प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**